# ३१ . ऐकावे जनाचे करावे मनाचे .

मित्रांनो प्रथम एक बोधकथा सांगतो . एकदा बेडूक एकत्र जमतात व खेळ , स्पर्धा घ्यायचे ठरवतात . एक स्पर्धा अशी असते की उडया मारत जाऊन शेताच्या पलीकडील खांबावर चढणे . शर्यतीचा दिवस उजाडतो .

बरेच तरूण बेडूक जमतात . बेडकांचा आवाज ऐकून शेतातील माणसेही जमतात व गंमत बघु लागतात . शर्यत सुरू होते . बेडूक उडया मारायला लागतात . शेतकरी मोठमोठयाने ओरडून प्रोत्साहन देण्याऐवजी बेडूक नाउमेद कसे होतील असे संभाषण मोठयाने करू लागतात . बरेच बेडूक बेचैन होतात . नाऊमेद होतात व शर्यतीतून बाहेर पडतात . काही बेडूक खांब चढायला लागतात . काही बेडूक चढता चढता पडतात . परत प्रयत्न करतात . फारच थोडे बेडूक शर्यतीत उरतात . शेतकरी हूर्यो करतच असतात . शेवटी तर एकच बेडूक उरतो व शर्यत पूर्ण करतो . खांबावर चढून तो आपल्या सहका–यांना अभिवादन करतो . सर्व बेडूक टाळया वाजवतात . शेतक–याना आश्र्चर्य वाटते कि ह्या बेडकाने कसे काय आपले ऐकले नाही ? विजयी बेडूक खाली उतरतो .

काही पत्रकार मंडळी बेडूकाला विचारतात की तुझ्या विजयाचे रहस्य काय ? शेतक–यांच्या टिकेचा तुझ्यावर कसा परिणाम झाला नाही ? तो विजयी बेडूक सांगतो कि माझ्यावर त्यांच्या बोलण्याचा परिणामच झाला नाही कारण मी बहिरा आहे . टिका करणारे शेतकरी अंर्तमुख होतात .

मित्रांनो गोष्ट एवढीच . गोष्टीतून आपल्या सर्वांनाच शिकण्यासारखे भरपूर आहे .

१ . आपल्या मराठीत एक म्हण आहे की एकावे जनाचे करावे मनाचे . त्यातलाच हा प्रकार आहे .

२ . आपण आयुष्यात ध्येय ठरविले पाहिजे . एकदा ध्येय ठरले की आपण आपला प्रवास ध्येयपूर्तिसाठी एकाग्रतेने करणे आवश्यक आहे . अर्थात ह्या प्रवासात आपले पाय खेचणारे लोक भेटले तर आश्र्चर्य वाटण्याचे कारण नाही . तो एक मनुष्य स्वभाव आहे . टिका करणा–यात ब–याच प्रकारचे लोक असतात . स्वतःला हुशार समजणारे , दुस–याला कमी लेखणारे , दुस–याच्या पराभावात आनंद मानणारे . कोणत्याही परिस्थितीत आपला आत्मविश्र्वास डळमळीत होता कामा नये . आपण काही दुस–याचे तोंड धरू शकत नाही . प्रत्येक जण स्वतःच्या कुवतीनुसार बोलणार . आपला निर्धार पक्का असेल तर ह्या सर्व बोलण्याचा आपल्यावर परिणामच होणार नाही . आपले आयुष्य कसे जगायचे हे आपणच ठरविले पाहिजे . आपण जरी समाजात राहत असलो तरी जोपर्यंत आपल्या वागण्याचा , ध्येयाचा समाजाला त्रास होत नाही तोपर्यंत आपल्याला काळजी करण्याचे कारण नाही .

३ . अर्थात वरील विवेचन / उपदेश फक्त ज्यांना ब–यावाईटाची उमज आली आहे अशा सारख्यांसाठीच आहे . जोपर्यंत आपण दुस–यांवर अवलंबून असतो, शिकत असतो तोपर्यंत मात्र आपण आपल्या पालकांचे , गुरूजनांचे ऐकणे आवश्यकच आहे . कारण त्यांच्या शिक्षणामुळे , अनुभवामुळे आपल्या जडणघडणीत ते

मोलाचा हातभार लावू शकतात. आपल्या बालवयात सर्वच गोष्टींचे भान आपल्याला असणे शक्य नसते. म्हणूनच जोपर्यंत आपली बुद्धि प्रगल्भ होत नाही तोपर्यंत दुस-याचे आपण ऐकलेच पाहिजे.

परंतु जेव्हा आपण आयुष्याच्या मध्यान्हीला येतो तेव्हा आपल्याला स्वतःसाठी जगता येणे आवश्यक असते.

मित्रांनो करा विचार. तुम्हाला माझ्या यशाचे रहस्य सांगतो की मी नेहमीच माझा आतला आवाज ऐकत आलो व एकदा निच्छित केलेल्या ध्येयापासून विचलीत झालो नाही. स्वतःसाठी जगलो. समाजाचे भान ठेवले. जेवढी मदत दुस-याला करता येईल तेव्हढी केली. लोकांनी गैरफायदा घेतला पण मला वाईट वाटले नाही कारण माझा हेतू प्रामाणिक होता.